शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.११ / २०२१

श्री.पोतेकर उमेश प्रकाश } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. डी.एस.शिक्षण संस्था, पाचगणी,
ता.महाबळेश्वर, जि.सातारा.
२. श्री.भिमराव शिंदे कला, वाणिज्य,
व विज्ञान महिला महाविद्यालय, वाई,
ता. वाई, जि.सातारा. } वि.प.

डी.एस.शिक्षण संस्था, पाचगणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा यांचे श्री. भिमराव शिंदे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, वाई, ता.वाई, जि.सातारा यांचेकडील शिक्षक श्री.पोतेकर उमेश प्रकाश यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१८/१०/२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

माझी दि. ०९ मे २०१७ रोजीच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत श्री.भिमराव शिंदे महिला महाविद्यालय, वाई मध्ये भूगोल विषयाच्या सहायक प्राध्यापकपदी निवड होवून संस्थेच्या जा.क्र. १३५०/२०१७ दि.१६/१०/२०१७ रोजीच्या नियुक्ती आदेशानुसार दि.०६/११/२०१७ रोजी महाविद्यालयात रूजू झालो. महाविद्यालय/संस्थेने मला शासन नियमानुसार वेतन दिलेले नाही. (पहिले १० महिने वेतनच दिले नाही. व नंतर अधूनमधून ४००० रू. खात्यावर जमा केले आहेत.) मी महाविद्यालयास दि.२६/०२/२०१९,दि.२४/०४/२०१९, दि.११/०५/२०१९, दि.२७/०६/२०१९ रोजी विनंती अर्ज करून शासन नियमानुसार देय होणारे थकीत वेतन देण्याविषयी विनंती केली. तसेच दि.२४/०३/२०१८ रोजी विद्यापीठाकडे वेतनासंदर्भात तक्रार अर्ज केला. विद्यापीठानेही संस्था/महाविद्यालयास दि.०४/०२/२०१९ व दि.२५/०३/२०१९ रोजी आदेशान्वये शासन

नियमानुसार देय होणारे थकीत वेतन देण्यास सांगितले. मात्र तरीही संस्था/महाविद्यालयाने माझे दि.०६/११/२०१७ ते दि.२४/१०/२०१९ पर्यंतचे शासन नियमानुसार देय होणारे थकीत वेतन अद्याप मला दिलेले नाही. तरी माझे दि.०६/११/२०१७ ते दि.२४/१०/२०१९ या कालावधीतील शासन नियमानुसार देय होणारे थकीत वेतन देण्यासंबधी संस्था/महाविद्यालयास आदेश व्हावेत ही नम्र विनंती.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

संस्था व महाविद्यालयाने सदर तक्रारीबाबत कोणताही अभिप्राय दिलेला नाही.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांनी समितीसमोर सादर केलेल्या कागदपत्रांसोबत संस्था अध्यक्ष, डी.एस. शिक्षण संस्था, पाचगणी यांनी तक्रारदार यांना दिलेला नियुक्ती आदेश जोडलेला आहे. या आदेशामध्ये श्री. भीमराव शिंदे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, वाई, जि. सातारा येथे दि. ०६/११/२०१७ पासून भूगोल विषयाकरिता सहाय्यक प्राध्यापक पूर्णवेळ असे नमूद केल्याचे दिसून येते.

तक्रारदार यांची नियुक्ती विद्यापीठ निवड समितीद्वारा श्री. भीमराव शिंदे महिला महाविद्यालय, वाई येथे सहाय्यक प्राध्यापक पदी निवड झाली. नियुक्ती आदेशानुसार तक्रारदार सहाय्यक प्राध्यापक पदी नियमित कार्यरत होते. तक्रारदार यांच्या कथनानुसार संस्था महाविद्यालयाने त्यांना पहिले १० महिन्यांचे वेतन दिले नाही व नंतर अधूनमधून ४,०००/- रू. खात्यावर जमा केलेले आहेत. सबब तक्रारदार यांचे कथनानुसार त्यांना संस्था व महाविद्यालयाने दि. ०६/११/२०१७ ते दि. २४/१०/२०१९ पर्यंतचे शासन नियमानुसार देय होणारे वेतन दिले नाही. सदरचे थकित वेतन संस्था व महाविद्यालयाकडे मागणी करणेकरिता तक्रारदार यांनी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना वेतन न मिळालेबाबत दि. २४/०३/२०१८ रोजीच्या पत्राने रजिस्टर पोस्टाने कळविलेचे दिसून येते. यांस अनुसरून विद्यापीठ कार्यालयाने दि. ०४/०२/२०१९ रोजीच्या पत्राने संस्था अध्यक्ष यांनी शासन नियमानुसार देय होणारे वेतन तक्रारदार यांना अदा करणेबाबत कळविल्याचे दिसून येते. तक्रारदार यांनी दि. २६/०२/२०१९ रोजी वेतन न मिळालेबाबत प्र.प्राचार्य श्री. भीमराव शिंदे महिला महाविद्यालय, वाई यांना रजिस्टर पोस्टाने पत्र दिल्याचे दिसून येते. त्याची प्रत कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना माहितीकरिता केल्याचे दिसून येते. त्याची पोहोच ही

यांनी या समितीसमोर हजर केली आहे. या पत्राची विद्यापीठ कार्यालयाने दखल घेवून अध्यक्ष, डी. एस. शिक्षण संस्था, पाचगणी ता. महाबळेश्वर, जि. सातारा यांना स्मरणपत्र क्र. १ ने विद्यापीठ परिनियम १९५ नुसार नियुक्ती आदेश देवून शासन नियमानुसार देय होणारे वेतन संबंधित शिक्षकांना तात्काळ अदा करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावे असे कळविलेचे दिसून येते.

उपरोक्त पत्रांच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दि. २४/०४/२०१९ रोजी प्र.प्राचार्य श्री. भीमराव शिंदे महिला महाविद्यालय, वाई यांना शासन नियमानुसार वेतन देण्याबाबत रजिस्टर पोस्टाने कळविले. तक्रारदार यांनी दि. ११/०५/२०१९ रोजी प्र.प्राचार्य श्री. भीमराव शिंदे महिला महाविद्यालय, वाई यांना विद्यापीठाचे पत्राच्या अनुषंगाने रू. ४,०००/- प्रमाणे तीन महिन्याचे वेतन खात्यावर जमा झाल्याचे नमूद करून शासन नियमानुसार वेतन देणेबाबत रजिस्टर पोस्टाने कळविलेचे दिसून येते. पुनःश्च दि. २७/०६/२०१९ रोजी नियुक्ती आदेश देण्याबाबत व दि. ०६/११/२०१७ पासूनचे शासन नियमानुसार देय होणाऱ्या थकित वेतनाबाबत मागणी केल्याचे दिसून येते. तसेच या तक्रारीच्या अनुषंगाने वेळोवेळी मा. राज्यपाल कार्यालयास ही लेखी पत्राने कळविल्याचे दिसून येते.

उपरोक्त सर्व पत्रव्यवहार रजिस्टर पोस्टाने प्राचार्य व संस्था यांना वेळोवेळी कळविल्याचे दिसून येते. या तक्रारीकामी समितीसमोर संस्थेचा अभिप्राय सादर झाला नसून संस्था व महाविद्यालयास वेळोवेळी संधी देवूनही या तक्रारीदाखल लेखी अथवा तोंडी म्हणणे त्यांचेकडून समितीसमोर सादर झालेले नाही. दि. २३/०३/२०२२ रोजी समितीने या तक्रारीकामी संस्था व महाविद्यालयास शेवटची संधी देवून देखील संस्था व महाविद्यालयातर्फे अधिकृत प्रतिनिधीतर्फे लेखी अथवा तोंडी म्हणणे सादर केलेले नाही. सबब समितीने याबाबींची गंभीर दखल घेवून सदरचे प्रकरण संस्थेच्या म्हणण्याशिवाय निर्णयास ठेवले. तक्रारदार यांना संस्थेने दिलेले दि. १६/१०/२०१७ रोजी जा.क्र. १३५०/२०१७ रोजीच्या नियुक्तीपत्रामध्ये 'पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापक' असे नमूद केले आहे व परिविक्षा कालावधीबाबत नमूद केले आहे. तथापी नियुक्ती पत्रामध्ये वेतनश्रेणी नमूद केलेली नाही. सबब तक्रारदार यांनी समितीसमोर सादर केलेली सर्व कागदपत्रे अवलोकनी घेता, संस्थेने श्री. भीमराव शिंदे आर्टस, कॉमर्स आणि सायन्स महिला महाविद्यालय, वाई येथे तक्रारदार यांना 'भूगोल' विषयाकरिता पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापक पदी परिविक्षा कालावधीबाबत नमूद करून नियुक्ती आदेश दिले आहेत. तक्रारदार यांनी सोबत जोडलेल्या दि वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, वाई या बँकेचे पासबुक झेरॉक्स

जोडली आहे. सदर बँक रेकॉर्ड अवलोकनी घेतला असता संस्थेकडून काही रकमा जमा झालेचे नोंदी दिसून येतात. या रकमा विचारात घेता संस्थेकडून तक्रारदार यांस पूर्णवेळ वेतनाची रक्कम जमा नसल्याचे दिसून येते. संस्थेने तक्रारदार यांचे वेतनाबाबत समितीसमोर हजर राहून कोणतेही स्पष्टीकरण ही दिलेले नाही. सबब समितीच्या असे निर्देशनास येते की, तक्रारदार यांचे म्हणण्यानुसार त्यांना नियमानुसार द्यावयाचे वेतन दिले गेले नाही तसेच नियुक्ती आदेशातही वेतनश्रेणी नमूद नसलेने संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांना नियमानुसार देय असणारे वेतन देणे बंधनकारक आहे. करीता समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

संस्थेने तक्रारदार यांना त्यांचे नियुक्ती दिनांकापासून ते सेवासमाप्ती दिनांकापर्यंत विद्यापीठ कायदा व परिनियमानुसार तसेच वेतनाबाबत लागू असणाऱ्या नियमानुसार देय होणाऱ्या वेतनातून त्यांना देण्यात आलेल्या वेतनाची रक्कम वजा करून उर्वरीत वेतनाच्या फरकाची रक्कम आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत तात्काळ अदा करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 02/06/2022

सदस्य
( डॉ. व्ही. एन.शिंदे )

सदस्य
(श्री. ए.ए. कुलकर्णी)

सदस्य
( डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य
(डॉ.एन.बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

अध्यक्ष
( श्री.एस.पी.कुलकर्णी )